# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व जेष्ठ वैज्ञानिक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीप्रीत्यर्थ दरवर्षी वाचनप्रेरणा दिन साजरा केला जातो. नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. विद्यापीठाच्या कुलगुरू प्रोफेसर शशिकला वंजारी यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. अर्चना भटनागर, ज्ञानस्त्रोत विभागाचे संचालक, डॉ. सुभाष चव्हाण, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. सुभाष वाघमारे उपस्थित होते.

विद्यापीठ गीताचे गायन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यापीठाच्या हिंदी, मराठी, गुजराती, संस्कृत व इग्रंजी या विभागातील विद्यार्थीनींनी विविध कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

संस्कृत भाषेतील सुभाषितांचे मराठी अर्थासह वाचन करण्यात आले. मराठी विभागाच्या विद्यार्थीनीनी गौरी देशपांडे लिखित ‘चित्रणी - कावळयाची गोष्ट’ या कथेचे वाचन केले. ‘एक और द्रोणाचार्य’ या नाटकातील अंशाचे अभिवाचन हिंदी विभागाच्या विद्यार्थिनीनी केले. इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनीनी या वर्षीचे नोबेल पारितोषिक विजेते कझूओ इशिगुरो यांच्या ‘द रिमेन्स ऑफ द डे’ या कादंबरीतील उताऱ्यांचे वाचन केले तसेच ‘विग्ज ऑफ फायर’ या ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या आत्मचरित्रातील उताऱ्यांचे अभिवाचन वाचन केले.

कुलगुरू, प्रोफेसर शशिकला वंजारी यांनी राष्ट्रउभारणीसाठी शिक्षणाचे महत्त्व आहे आणि ज्ञानार्जनासाठी वाचनाची गरज असल्याचे सांगून अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सर्व विभागाचे विभागप्रमूख, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.


SNDT Women's University
१५ ऑक्टोबर
भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम जयंती
वाचन प्रेरणा दिन
स्थळ: पाटकर सभागृह, चर्चगेट आवार




SNDT Women's University




SNDT Women's University



